# महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

# ई-पंचायत

जिल्हा परिषद: ------------------------

# ई-पंचायत (संग्राम प्रकल्प)

## संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र

- भारतनिर्माण कार्यक्रमातील नॅशनल गव्हर्नन्स कार्यक्रमाअंतर्गत सर्व पंचायती राज संस्थांचे संगणकीकरण करुन त्यांच्या कारभारात एकसुत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी ई.पी.आर.आय./ई-पंचायत हा मिशन मोड प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.
- महाराष्ट्रातील सर्व पंचायती राज संस्थांचे (जिल्हा परिषदा, पंचायती समित्या व ग्रामपंचायती) संगणकीकरण करुन त्यांचा कारभार ऑनलाईन करण्याचा महत्वांकाक्षी संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र (संग्राम) हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.
- प्रकल्प राबविण्यासाठी व अंमलबजावणी करिता महाऑनलाईन लिमिटेड (महाराष्ट्र शासन व टिसीएस यांची राज्यशासन अंगीभूत कंपनी) ची नेमणूक करण्यात आलेली आहे.

# ई-पंचायत (संग्राम प्रकल्प)

महाराष्ट्रात हा प्रकल्प सं.ग्रा.म. (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) या नावाने राबविण्यात येत आहे.

**ई-पंचायत प्रकल्पाची उद्दीष्टे:**

- सर्व पंचायती राज संस्थांचा कारभार ऑनलाईन करणे.
- सर्व पंचायती राज संस्थांचा कोष (Database) तयार करणे.
- सर्व पंचायती राज संस्थांमध्ये राबविल्या जाणाऱ्या ग्रामविकासाच्या योजनांची ऑनलाईन देखरेख करणे.
- ई-ऑफिसची **(e-Office)** अंमलबजावणी करणे.
- ई-निविदा प्रणालीचे **(e-Tendering)** विविध स्तरावर प्रशिक्षण देणे व अंमलबजावणी करणे.
- ई-पंचायत सुटमधील ११ आज्ञावलींमध्ये माहिती भरणे.

# ई-पंचायत (संग्राम प्रकल्प)

- नरेगा व इंदिरा आवास योजना आज्ञावलीत माहिती भरणे.
- पंचायती राज संस्थांच्या  अभीलेख्यांचे स्कॅनिंग आणि Digitization करणे.
- ग्रामीण भागात संगणक साक्षरता वाढविणे.
- गावोगावी  ग्रामसेवा केंद्राच्या माध्यमातून संगणक प्रशिक्षण देणे.
- ग्रामीण भागातील तांत्रिक मनुष्यबळ सक्षम करणे .
- ग्रामीण भागात व्यवसायिक सुविधा पोहोचविणे.
- राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्राम सेवा केंद्र स्थापन करून नागरिकांना विविध  सुविधा उपलब्ध करून देणे.

# ई-पंचायत (संग्राम प्रकल्प)

शासन निर्णय दि. **२६** व **३०** एप्रिल, **२०११** च्या मार्गदर्शक सुचनांनुसार दि. **१** मे,**२०११** रोजी ई-पंचायत प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा शुभारंभ करण्यात आला.



# NIC आज्ञावली

या प्रकल्पातंर्गत पंचायती राज मंत्रालय - नवी दिल्ली यांनी पंचायती राज संस्थांच्या कारभाराशी निगडीत ११ प्रकारच्या आज्ञावली राष्ट्रीय सुचना केंद्राच्या (NIC) मदतीने विकसित केल्या आहेत.

| क्र | आज्ञावली | उद्देश |
|---|---|---|
| १ | **नॅशनल पंचायत डिरेक्टरी / लोकल गर्व्हनमेन्ट डिरेक्टरी** | ▪ सर्व पंचायती राज संस्थाना विशिष्ट संकेतांक देवून तो संलग्न आज्ञावलीसाठी वापरात आणणे<br>▪ NIC च्या सर्व Software ला लागणारा Basic Data हा पंचायत डिरेक्टरीमध्ये दर्शविला जातो<br>▪ विधानसभा मतदारसंघाचे (Assembly Constituency) मॅपिंग |
| २ | **नॅशनल पंचायत प्रोफाईलर/ एरिया प्रोफाइलर** | ▪ सर्व पंचायती राज संस्थांचे भौगोलिक क्षेत्र, सामाजिक,आर्थिक, भौतिक, सोई-सुविधा तसेच संबंधीत पंचायत राज संस्थेमधील लोकप्रतिनिधींची माहिती<br>▪ ग्रामपंचायत स्तरावर कुटुंब नोंदणी व्यवस्थापन<br>▪ सर्व पंचायत स्तरांवर निवडणूक व निवडून आलेल्या प्रतिनिधींची माहिती<br>▪ सर्व पंचायत स्तरांवरील कार्यालयीन कामकाजाच्या तपशीलाचे व्यवस्थापन |
| ३ | **प्लॅन प्लस** | ▪ स्थानिक भाषेत विकेन्द्रीकृत सुविधांचे नियोजन<br>▪ निधीचे एकत्रीकरण<br>▪ निधीचा पुरेपूर विनियोग व नियंत्रण |
| ४ | **प्रियासॉफ्ट** | ▪ पंचायती राज स्तरावर म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचे जमाखर्च लेखे व इतर अनुषंगिक अहवाल उपलब्ध करुन घेणे<br>▪ लेख्यांमध्ये पारदर्शकता, अचुकता व तत्परता आणणे |

# NIC आज्ञावली

| क्र | आज्ञावली | उद्देश |
| --- | --- | --- |
| ५ | **ॲक्शन सॉफ्ट** | ▪ पंचायती राज संस्थाकडुन राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी व देखरेख<br>▪ निधीचा योग्य वापर<br>▪ कामाचा भौतीक व वित्तीय प्रगती आढावा |
| ६ | **ॲसेट डिरेक्टरी** | ▪ पंचायती राज संस्थांच्या मालकीच्या तसेच अधिपत्याखालील सर्व स्थावर व जंगम मालमत्तांचे अभिज्ञान व व्यवस्थापन |
| ७ | **सर्विस प्लस** | ▪ शासनाकडून नागरिकांना सर्व प्रकारच्या सेवा (प्रमाणपत्रे/दाखले) देणे |
| ८ | **सोशल ऑडीट** | ▪ सर्व विकास योजना व या योजनांचा जमाखर्च, यांना ग्रामसभेची मान्यता व यावर ग्रामसभेचे नियंत्रण<br>▪ पंचायत स्तरावरील सर्व प्रकारच्या बैठकांचे व्यवस्थापन |
| ९ | **ट्रेनिग मॅनेजमेन्ट** | ▪ सर्व पंचायती राज पदाधिकाऱ्यांना ऑनलाईन ट्रेनिंगचे आयोजन करणे<br>▪ प्रशिक्षणासंबंधी विनंती स्वीकारण्याची तरतूद व परिणाम विश्लेषण<br>▪ प्रशिक्षण पद्धतीचे वेळापत्रक व त्याचा आढावा<br>▪ प्रशिक्षण संस्था व व्यक्तींचा साठा<br>▪ प्रशिक्षण व वाचन सामुग्रीची ऑनलाईन उपलब्धता |
| १० | **नॅशनल पंचायत पोर्टल** | ▪ सर्व पंचायती राज संस्थांचे संकेतस्थळ व संलग्न माहिती<br>▪ पंचायत पोर्टल वरील व्यापक आधारसामग्रीचे व्यवस्थापन<br>▪ पंचायत प्रोफाइल मध्ये भुगोल, जनसांख्यिकी, मतदान, निवडून आलेल्या सभासदांची माहिती इत्यादींचा समावेश |
| ११ | **बेसिक GIS प्रणाली** | ▪ सर्व पंचायती राज संस्थाचा परिपूर्ण नकाशा व नियोजन |

# नॅशनल पंचायत डिरेक्टरी/लोकल गव्हर्नमेंट डिरेक्टरी

**http://panchayatdirectory.gov.in**

---

**उद्देश:**

- सर्व पंचायती राज संस्थाना विशिष्ट संकेतांक देवून तो संलग्न आज्ञावलीसाठी वापरात आणणे.
- **NIC** च्या सर्व **Software** ला लागणारा **Basic Data** हा पंचायत डिरेक्टरीमध्ये दर्शविणे.
- यामध्ये विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे **(Assembly Constituency)** मॅपिंग करणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- सर्व पंचायती राज संस्थांचा कोष (Database) तयार करण्यास मदत होते त्याचप्रमाणे शासनाच्या विविध आज्ञावलींमध्ये समान माहिती संलग्न करण्याकरिता उपयोग होतो.
- लोकसभा व विधानसभा मतदारसंघाची वार्ड, गाव, तालुका व जिल्हानिहाय माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते.
- २००१ व २०११च्या जनगणनेची सांख्यिकी महिती एका क्लिकवर उपलब्ध होते.

# नॅशनल पंचायत प्रोफाईलर/एरिया प्रोफाइलर

**http://areaprofiler.gov.in**

---

**उद्देश:**

- सर्व पंचायती राज संस्थांचे भौगोलिक क्षेत्र, सामाजिक, आर्थिक, भौतिक, सोई-सुविधा तसेच संबंधीत पंचायत राज संस्थेमधील लोकप्रतिनिधींची माहिती.
- ग्रामपंचायत स्तरावर कुटूंब नोंदणी व्यवस्थापन .
- सर्व पंचायत स्तरांवर निवडणुक व निवडून आलेल्या प्रतिनिधींची माहिती.
- सर्व पंचायत स्तरांवरील कार्यालयीन कामकाजाच्या तपशीलाचे व्यवस्थापन.

**उद्दीष्टे/फायदे:**

- ग्रामपंचायत स्तरावरील नागरिकांची आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण संबंधी माहिती आणि व्यवस्थापन करण्याकरिता शासनास मदत होते.
- ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद स्तरावरील सुविधा, कुशल कामगार, अधिकारी यांची माहिती उपलब्ध होते.
- पर्यटन स्थळांच्या विकासासाठी या आज्ञावलीचा फायदा होतो.

# प्लॅन प्लस

**http://planningonline.gov.in**

---

**उद्देश:**

- गावपातळीवरील नियोजन प्रक्रिया स्थानिक भाषेमध्ये करणे.
- कार्याचा आराखडा बनविण्यास मदत करणे.
- विविध निधींचा नियोजनबद्ध आराखडा बनविणे.
- ग्रामीण गटाच्या नियोजनाचा उपयोग जिल्हयाच्या नियोजनासाठी करणे.
- नकाशे व भौगोलिक माहिती कोष बनविण्यासाठी महत्वाची भुमिका बजाविणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- नियोजन प्रक्रिया सुधारीत व बळकट करण्यासाठी.
- निधींच्या पुरेपूर विनियोगाचे नियोजन करण्यासाठी.
- गावपातळीवरील  कामाचे सुक्ष्म नियोजन करण्यासाठी.
- या आज्ञावलीचा उपयोग ग्रामसभेतील मंजुर झालेले ठराव पंचायत समिती, जिल्हा परिषद व नियोजन विभागाला पाठविण्यासाठी होतो.

# प्रिया सॉफ्ट

**http://accountingonline.gov.in**

सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांचे लेखे/जमा-खर्च ऑनलाईन करणेकरिता सदरील प्रणाली **NIC** मार्फत विकसीत करण्यात आलेली आहे.

**उद्देश:**

- दैनंदिन लेख्यांची दररोज आज्ञावलीत नोंद करणे व लेखे अद्ययावत ठेवणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- विविध स्तरांवर पारदर्शकता निर्माण होते.
- लेख्यांची एकत्रित माहिती तात्काळ उपलब्ध होते.
- जमाखर्चाचे व्यवस्थापन योग्य व अचुक रितीने करण्यास मदत होते.
- सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांचे लेखे/जमा-खर्चाचा अहवाल अल्पावधीत सादर करण्यासाठी मदत होते.

# ॲक्शन सॉफ्ट

**http://reportingonline.gov.in**

---

**उद्देश:**

- पंचायत राज संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी व देखरेख करणे.
- ग्रामीण व शहरी गटांचा भौतीक आणि वित्तीय प्रगती अहवाल तयार करणे.
- कामाच्या भौतीक आणि वित्तीय प्रगतीचा आढावा घेणे.
- विविध मार्गे येणाऱ्या निधींचा उपयोग व नियंत्रण ठेवणे .
- वित्तीय आणि भौतीक प्रगती अहवालात पारदर्शकता आणणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- प्लॅन प्लस मध्ये तयार केलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यासाठी उपयोग होतो.
- पंचायती राज संस्थांकडुन राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपयुक्त आहे.
- ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांना अहवाल सादर करण्यासाठी उपयोग होतो.

# नॅशनल ॲसेट डिरेक्टरी

**http://assetdirectory.gov.in**

**उद्देश:**

- पंचायती राज संस्थांच्या मालकीच्या तसेच अधिपत्याखालील सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे अभिज्ञान व व्यवस्थापन करणे.
- सर्व स्थावर व जंगम मालमत्तेची मुद्देसूद माहिती सुरक्षीत ठेवणे.
- सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचा अहवाल तयार करणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- पंचायती राज संस्थांच्या मालकीच्या तसेच अधिपत्याखालील सर्व प्रकारच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा सुयोग्य वापर करण्यासाठी. उदा: संगणक, मुद्रक, वाहने, इमारती इत्यादी.
- स्थावर व जंगम मालमत्तेचे नियंत्रण व सुव्यवस्था ठेवण्यासाठी उपयुक्त.
- स्थावर व जंगम मालमत्तेचे तयार केलेले अहवाल आवश्यक त्या ठिकाणी सादर करण्यासाठी.

# सर्विस प्लस

**http://serviceonline.gov.in**

**उद्देश:**

- शासनाकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या (G2C) सेवा (दाखले/प्रमाणपत्रे) देण्याकरिता सदर प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- ग्रामपंचायत स्तरांवर देण्यात येणाऱ्या विविध सेवा उदा. रहिवासी दाखला, जन्म व मृत्यु दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, दारिद्रय रेषेखालील दाखला इत्यादी प्रमाणपत्रे नागरिकांना त्यांचे ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध होतात.
- **Government to Government (G2G)** सेवा – शासन ते शासन स्तरावरील अहवाल .
- **Government to Business (G2B)** सेवा – शासन ते व्यापारी सेवा उदा. परवाने, निविदा.
- **Government to Employee (G2E)** सेवा – शासन ते कर्मचारी सेवा उदा. सेवा पुस्तके.
- **Government to Citizen (G2C)** सेवा – शासनाकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा
  उदा. दाखले, प्रमाणपत्रे, वीज देयक भरणा, तिकीट आरक्षण इत्यादी सेवा ग्रामस्थांना देण्यात येणार आहेत. (शासन निर्णय २३ मे, २०१२)

# ग्राम सेवा केंद्र

महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीं मधुन नागरीकांना लागणारे दाखले/प्रमाणपत्रे (G2C सेवा) ग्राम सेवा केंद्रातून दिले जातात.

राज्यातील सर्व ग्राम सेवा केंद्रांना दिनांक २३ मे, २०१२ च्या शासन निर्णयानुसार महा-ई-सेवा केंद्र / CSC चा दर्जा देण्यात आला आहे.

## ग्राम सेवा केंद्रा मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा

| क्र | दाखले / प्रमाणपत्र | क्र | दाखले / प्रमाणपत्र |
|---|---|---|---|
| १ | जन्म नोंदणी व प्रमाणपत्र | ११ | बेरोजगार प्रमाणपत्र |
| २ | मृत्युची नोंदणी व प्रमाणपत्र | १२ | वीजेच्या जोडणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र |
| ३ | दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र | १३ | कोणत्याही योजनेचा फायदा घेतला नसल्याचे प्रमाणपत्र |
| ४ | रहिवाशी दाखला व प्रमाणपत्र | १४ | शौचालय दाखला |
| ५ | हयातीचा दाखला | १५ | जॉब कार्ड |
| ६ | विवाहाचा दाखला | १६ | बांधकामासाठी अनुमती प्रमाणपत्र |
| ७ | नोकरी व व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र | १७ | नळ जोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र |
| ८ | मालमत्ता आकारणी प्रमाणपत्र | १८ | चारित्र्याचा दाखला |
| ९ | मालमत्ता फेरफार प्रमाण पत्र / प्रत | १९ | निराधार योजनेसाठी वयाचा दाखला |
| १० | ना देय प्रमाणपत्र | | |

# सोशल ऑडीट

**http://socialaudit.gov.in**

---

**उद्देश:**

- पंचायत राज संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांचे ग्रामसभेकडून परिक्षण करणे.
- पंचायत राज संस्थाकडून राबविण्यात येणाऱ्या कामांचे भौतिक व वित्तीय प्रगतीचे परिक्षण करणे.
- वित्तीय व भौतिक प्रगती अहवालात पारदर्शकता आणणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- पंचायती राज संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांचे ग्रामसभेमार्फत परिक्षण करण्यासाठी उपयोग होतो.
- पंचायती राज संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांच्या अंमलबजावणीवर ग्रामसभेमार्फत नियंत्रण ठेवण्यासाठी उपयुक्त आहे.
- ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांना परिक्षण अहवाल सादर करण्यासाठी उपयोग होतो.

# ट्रेनींग मॅनेजमेंट
# प्रशिक्षण

http://trainingonline.gov.in

---

**उद्देश:**

- सर्व पंचायती राज पदाधिकाऱ्यांना ऑनलाईन कामकाजाचे प्रशिक्षण देणे.
- प्रशिक्षणासंबंधी विनंती स्वीकारण्याची तरतुद करणे व परिणाम विश्लेषण करणे.
- प्रशिक्षण पद्धतीचे वेळापत्रकाचा आढावा घेणे.
- प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षण इच्छुक तसचे प्रशिक्षणप्राप्त व्यक्तींच्या माहितीचे संकलन करणे.
- प्रशिक्षण व वाचन सामुग्रीचा ऑनलाईन संकलन तयार करणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- सर्व पंचायती राज पदाधिकाऱ्यांना ऑनलाईन कामकाज पद्धतीची माहिती होते.
- संगणक हाताळणीचे व इंटरनेट वापराबाबतचे ज्ञान प्राप्त होते.
- वेळेचे सुनियोजन व अल्पावधीत कार्य पुर्ण करण्यासाठी उपयोग होतो.
- प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व साधनांची उपलब्धता व अंमलबजावणी करण्यासाठी उपयोग होतो.
- प्रशिक्षण प्रभावीपणे राबविण्यासाठी या आज्ञावलीचा उपयोग होतो.

# नॅशनल पंचायत पोर्टल

**http://panchayatportals.gov.in**

---

**उद्देश:**

- सर्व पंचायती राज संस्थांचे (जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती) संकेतस्थळ अद्ययावत ठेवणे व संलग्न माहिती भरणे.
- पंचायत प्रोफाइल मध्ये भुगोल, जनसांख्यिकी, मतदान, निवडून आलेल्या सभासदांच्या माहितींचा समावेश करणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरांवरील नमुद केलेली माहिती उपलब्ध होते.
- गावांचा, तालुक्यांचा व जिल्हयाचा, पर्यटन विकास व विविध जनकल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचे व्यवस्थापन करण्यास मदत होते.
- ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद स्तरांवरील सुविधा, निवडून आलेल्या सभासदांची आणि अधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध होते.
- मराठीमध्ये उपलब्ध केलेली माहिती जगात कुठेही ऑनलाईन पाहता येते .

# जिओग्राफिकल इन्फॉर्मेशन सिस्टीम

**उद्देश:**

- सर्व पंचायती राज संस्थांचा परिपूर्ण नकाशा व नियोजन.
- सर्व पंचायती राज संस्थांचे भौगोलिक क्षेत्र, भौतिक सोई-सुविधा तसेच संबंधीत पंचायती राज संस्थेची भौगोलिक माहिती, पत्ता, अक्षांश व रेखांश नोंदीद्वारे
- पर्यटकांना माहिती उपलब्ध करून देणे.

**उद्दीष्टे/फायदे:**

- सर्व पंचायती राज संस्थांचे भौगोलिक क्षेत्र, भौतिक सोई-सुविधा तसेच संबंधीत पंचायती राज संस्थेच्या भौगोलिक माहितीचा उपयोग नियोजन प्रक्रियेमध्ये होतो.
- पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी होतो.

# साध्य

- तात्कालीन केंद्रीय ग्राम विकास मंत्री मा. श्री. जयराम रमेश यांनी ग्रामपंचायतीमधील संग्राम केंद्रातील वेब कॅमेऱ्याद्वारे महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री मा. श्री. जयंत पाटील यांच्याशी संवाद साधला.





- दि. २ ऑक्टोबर रोजी राज्यात घेण्यात आलेल्या ग्रामसभांपैकी कोल्हापूर व चंद्रपूर जिल्हयातील ग्रामपंचायतीतील ग्रामसभांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेब कॅमेऱ्याद्वारे संबोधित केले.

# साध्य

- सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांची एकुण **२८,२७५** संकेतस्थळे तयार करण्यात आलेली आहेत.
- भारत सरकारतर्फे ग्रामीण भारतात ई-पंचायत प्रकल्प अमंलबजावणीचे सन **२०११-१२** चे राष्ट्रीय पातळीवरील पहिले पारितोषिक महाराष्ट्र सरकारच्या ग्रामविकास विभागाला प्राप्त झाले आहे.

